
# तिफण

वर्ष : १२ वे । अंक ४ था

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च- २०२२

# मूर्तीशिल्प, कला व स्थापत्य

## विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक


# तिफण

वर्ष १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

| | | |
|---|---|---|
| 76. | औरंगाबाद शहरातील भडकल दरवाजा - स्थापत्यशास्त्रीय विवेचन<br>- आकाश जनार्धन बोकडे | 348 - 351 |
| 77. | किल्ले रामशेजवरील जलव्यवस्थापन<br>- गोरख शिवाजी शेवाळे | 352 - 354 |
| 78. | ऐतिहासिक किल्ले नळदुर्ग : जतन व संवर्धन<br>- दादासाहेब जगन्नाथ कांबळे | 355 - 357 |
| 79. | वेरूळ लेणीतील बौध्द स्त्री देवता<br>- डॉ. शिरिष पवार | 358 - 360 |
| 80. | वेरूळ बौध्द लेणीतील महामयुरीचे शिल्प<br>- डॉ. आशोक कानडे | 361 - 362 |
| 81. | वेरूळ बौध्द लेणीतील मनुषी बुध्द<br>- अर्जुन गंगाराम पट्टेकर | 363 - 364 |
| 82. | अजिंठा लेणीतील बुध्द व राहुल यांचे शिल्प<br>- सुरेश महादेव मादळे | 365 - 367 |
| 83. | कान्हेरी लेणीतील पद्मपाणी अवलोकितेश्वर<br>- डॉ. सचिन बनसोडे | 368 - 369 |
| 84. | अजिंठा लेणीतील यक्ष<br>- डॉ. संजय पाईकराव | 370 - 371 |
| 85. | धारकुंड येथील दुर्लक्षित लेणी<br>- डॉ. नम्रता दिलीप भोसले | 372 - 374 |
| 86. | सोलापूर जिल्ह्यातील दुर्लक्षित वीरगळ<br>- डॉ. किरण काळे | 375 - 377 |
| 87. | भामनेर मावळाला कल्याणशी जोडणारा घाटरस्ता : अंबालिक विहार आणि इतर स्थान वैशिष्टे - गणेश फलके | 378 - 381 |
| 88. | सांची येथील स्तूपाच्या महिला देणगीदार आणि बौद्ध धर्मातील लिंगभाव समानता - डॉ. जगदीश छबूराव सोनवणे | 382 - 385 |
| 89. | लेण्यातील चित्रशिल्पातून प्रतिबिंबीत समाजजीवनाचा चिकित्सक अभ्यास - दिग्वीजय सुरेश सोनोने | 386 - 390 |
| 90. | प्राचीन भारतीय मंदिर स्थापत्य<br>- लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 391 - 394 |



# प्राचीन भारतीय मंदिर स्थापत्य

- लेफ्ट. डॉ. अर्चना टाक

इतिहास विभाप्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

मो. क्र. – ९८५००८२४०३, इ-मेल : dept.of.history.rsml@gmail.com

मंदिर हा संस्कृत शब्द आहे. मराठी भाषेमध्ये त्याला देवालय असे म्हणतात. जिथे देवतांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केलेली असते, ते ठिकाण म्हणजे देवालय होय. ज्याने दिव्य देह धारण केलेला असतो त्याला देव असे म्हटले जाते. ज्याच्या ठिकाणी दिव्य तेज अथवा सामर्थ्य असते, तो म्हणजे देव होय. या देवतांच्या मूर्तींच्या प्रतिष्ठापनेसाठी, निवासासाठी देवालये निर्माण झाली. दिवसानंतर रात्र कशी होते? रात्रीनंतर दिवस कसा काय उगवतो? सोसाट्याचे वारे कसे काय वाहू लागतात. अचानक पाऊस कसा पडतो? हे प्रश्न अगदी प्राचीन काळातल्या मानवाच्या मनात निर्माण झाले. या गोष्टीना माणूस रोखू शकत नव्हता. निसर्गाची ही शक्तिरूपे मानवाच्या आवाक्यातली नव्हती. ज्या गोष्टींवर मानव नियंत्रण मिळवू नव्हता, त्या गोष्टींना तो घाबरू लागला आणि त्यांनाच तो देव मानु लागला. देवांना राहण्यासाठी देवालये म्हणजेच मंदिरे निर्माण केली जाऊ लागली. आज भारत जगभरातील पर्यटकांमध्ये मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. प्राचीन काळात भारतामध्ये निर्माण झालेल्या या मंदिर स्थापत्यावर या शोध निबंधातून प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

विविध देव मूर्तींच्या रूपाचे दर्शन घडविणारे स्थळ म्हणजे मंदिर होय. अगदी प्राचीन काळात देव मूर्ती फरशीवर किंवा शिलाफलकावर तयार झाली. तिचे आश्रयस्थान म्हणजे झाडाखाली उघड्यावर होय. पुढील काळात देव मूर्ती ठेवलेल्या पुजास्थानाचे वेगळेपण दाखविण्यासाठी व संरक्षण होण्यासाठी त्याभोवती दगडी कठडा बांधण्यात येऊ लागला.[1]

ऊन, वारा, पाऊस या पासून देवतांचे संरक्षण होण्यासाठी गवताचे छप्पर तयार केले जाऊ लागले. त्याला पर्णकुटी असे म्हणतात. बौद्ध काळात चैत्यगृहाचे विकसित रूप होते. प्राचीन काळी समाजाचे केंद्रस्थान असलेली



Head-Product Development, West Coast Paper
31, Jawaharlal Nehru Road, Kolkata - 700 016,
Phone No.: 033 - 71500618

यज्ञसंस्थेची जागा नंतरच्या काळात मंदिर संस्थेने घेतली.[२]

यज्ञाची जागा, देवपूजा, दानपरिषद या यज्ञासंबंधित बाबींची मंदिर या वास्तूशी सांगड घातली गेली. गा मंडप हे यज्ञकुंडाच्या स्थानी आले. गाभाऱ्यात प्रत्यक्ष मूर्तीची स्थापना झाली. आहुतीच्या ऐवजी नैवेद्य आला. प भूमीच्या जागी सभामंडप आला. मूर्तीपूजा आणि मंदिर स्थापत्याची मुळे इतिहास काळाच्या प्रारंभी भारतात मे प्रमाणात प्रचलित असलेल्या यक्षपुजेत होती. मुर्तीपुजेत मंदिर हा महत्वाचा घटक आहे. मुर्तीपुजेच्या प्रथेतूनच मंदि संकल्पना तयार झाली.[३] कोणत्याही समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात मंदिरांना महत्वाचे स्थान अ समाजाच्या सामुदायिक रूढी, परंपरा तेथे जतन केल्या जातात. सार्वजनिक उत्सव , शुभ कार्ये देखील याठिकाणं पाडली जातात. त्यामुळे सांस्कृतिक जीवन समृद्ध होते.

प्राचीन काळात भारतात डोंगर अथवा मोठमोठे खडक खोदुन गुहामंदिरे तयार केली जाऊ लागली. त लेणी असे म्हणतात. हा वास्तुप्रकार सम्राट अशोकाच्या काळात सुरु झाला. साधारणपणे वास्तू बांधण्यासाठी विटा, चुना, माती हे साहित्य वापरले जाते. परंतु लेण्यांच्या बाबतीत मात्र हे साहित्य वापरले जात नाही. लेण्य वरच्या छताला आधार देण्यासाठी खास योजना करावी लागत नाही. लेणीला आकार द्यावा लागतो. जैन, बौद्ध व धर्मीय लेण्या प्राचीन काळात भारतामध्ये निर्माण झाल्या. प्राचीन भारतीय वास्तुकलेचे खास वैशिष्ट्य म्हणून त्यांच्य पाहिले जाते. ज्या भागात मोठे-मोठे डोंगर असत त्या भागात अशा लेण्या निर्माण झाल्या. परंतु जेथे असे डोंगर तेथे सपाट भूपृष्ठावर मंदिरे बांधण्यास सुरुवात झाली. अशा प्रकारच्या बांधीव मंदिर रचनेचा प्रारंभ गुप्त काळात इ आंध्र प्रदेशातील चेझर्ला (गुंटूर) येथील मंदिर हे बांधीव मंदिर रचनेची पहिली अवस्था म्हणून ओळखले जाते. चौ सभागृह, सभागृहामागे अर्धवर्तुळाकार भिंत, तिच्यापुढे स्तूप, स्तुपासमोर स्तंभांच्या दोन रांगा, त्यांच्या मागे चिं दालने (पाखी), वार घुमटाकृती छत अशी या मंदिराची रचना आहे. सुरुवातीला हे मंदिर बौद्ध मंदिर हेते. नंतर रुपांतर शैव मंदिरात झाले.

मध्य प्रदेशातील सांची येथील १७ व्या क्रमांकाचे मंदिर ही बांधीव मंदिर रचनेची दुसरी अवस्था हो मंदिराची रचना गर्भगृह, त्याच्या समोर चार स्तंभांनीयुक्त असा भिंती नसलेला मोकळा द्वारमंडप आहे. यातील स्त काही प्रमाणात अशोक स्तंभा मिळते जुळते आहेत. स्तंभांचा पाया चौरस, त्यावर अष्टकोनी दंड. त्याच्यावर उ आकाराचे कमळ व त्यावर शेवटी पाठीला पाठ लावलेल्या सिंहांचीउठाव शिल्पे कोरलेली आहेत.

कर्नाटक राज्यातील बदामी जवळील ऐहोळ येथील दुर्गा मंदिर हे बांधीव मंदिर रचनेची तिसरी अवस्था मंदिरनगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या एहोळ गावात लहान-मोठी मिळून जवळपास ७० प्राचीन मंदिरे आहेत. यातील मंदिर हे गुप्त राजवटीच्या शेवटच्या काळात बांधले गेले आहे. त्याची रचना बौद्ध चैत्यगृहाशी मिळती-जुळती सुरुवातीला सभामंडप आहे. त्यात स्तंभांच्या दोन रांगा आहेत. त्या रांगांच्या दोन्ही बाजूस चिंचोली दालने (प आहेत. मागील बाजूस अर्धवर्तुळाकृती भिंत आहे. भिंतीसमोर दुर्गा देवीची मूर्ती आहे. सभामंडपावर कमा छताऐवजी सपाट छत आहे. प्रदक्षिणा मार्ग गाभाऱ्याच्या बाहेरून आहे. या मंदिराच्या गर्भगृहावर लहानशा शिख रचना केलेली आहे. हे या मंदिराचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. हे मंदिर उंच चौथऱ्यावर बांधले आहे. त्यावर उठाव कोरली आहेत व नक्षीकाम केले आहे.

अशा पद्धतीने प्राचीन काळात भारतात सपाट भूपृष्ठावर मंदिरे निर्माण होण्यास सुरुवात झाली. भारत वेगवेगळ्या भागात निर्माण झालेल्या या मंदिरांची स्वतःची अशी वेगवेगळी वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. ही वै



31, Jawaharlal Nehru Road, Kolkata - 700 016, India
In case of customer complaint please contact:

प्रदेशानुसार बदलत गेली आहेत. या वैशिष्ट्यांमुळेचभारतातील या भव्य आणि दिव्य मंदिरांच्यानागर शैली, द्राविड शैली आणि वेसर शैली या तीन प्रमुख शैली निर्माण झाल्या आहेत. प्रांतांनुसारयात फरकही आहे.

**नागर मंदिर शैलीची वैशिष्ट्ये -**

- ही मंदिर स्थापत्य शैली प्राचीन काळाच्या शेवटी-शेवटी उत्तर भारतात निर्माण झाली.
- या शैलीच्या मंदिर रचनेत उभ्या रेषांवर अधिक भर आहे, त्यामुळे ती अधिक उंचीची वाटतात.
- नागर मंदिरांचे गर्भगृह चौरस आकाराचे असते. त्याच्या भिंतीचे काही भाग बाहेरून पुढे आलेले असतात, त्यामुळे त्यांचे त्रिरथ, पंचरथ, सप्तरथ व नवरथ असे प्रकार निर्माण होतात.
- नागर मंदिरांच्याशिखराचा आकार शंकूप्रमाणे वर निमुळता होत जाणारा असून गर्भगृहावरील शिखर सर्वात उंच व इतर सभामंडपावरील शिखरे क्रमाक्रमाने कमी उंचीची दिसतात.
- शिखराच्या मुख्य आकाराच्या वर बसक्या लोट्याप्रमाणे दिसणाऱ्या भागाला आमलक म्हणतात.
- आमलाकांवर असणाऱ्या उभ्या रेषांना कंगोरे म्हणतात.
- आमलकाच्या सर्वात वर पुष्पपात्रासारखा टोकदार कळस असतो.
- भारताच्या विविध प्रांतात विकसित झालेल्या सोळंकी शैली (गुजरात), चंदेल शैली (मध्य प्रदेश), ओरिसा शैली, राजस्थान शैली, काश्मीर शैली या नागर शैलीच्या उपशैली आहेत.
- उदा. लिंगराज मंदिर-ओरिसा, सूर्यमंदिर- कोणार्क, जगन्नाथ मंदिर-पुरी, कंडारीय महादेवाचे मंदिर-खजुराहो.

**द्राविड मंदिर शैलीची वैशिष्ट्ये –**

- ही मंदिर स्थापत्य शैली प्राचीन काळाच्या शेवटी-शेवटी दक्षिण भारतात निर्माण झाली.
- या मंदिरांच्याशिखर रचनेमुळे ती कमी उंचीची वाटतात.
- द्राविड शैलीच्या मंदिरांच्या शिखरांवर सर्वात वरती घुमटासारखा गोल किंवा अष्टकोनी आकाराचा एक भाग असतो, त्याला स्तुपिका असे म्हणतात.
- द्राविड मंदिर शैलीमध्ये गर्भगृह व त्यावरील शिखर या रचनेला विमान असे म्हणतात.
- या मंदिर शैलीमध्ये वरील बाजूस कमी-कमी होत जाणाऱ्या आकारांचे मजले एकावर एक बांधून शिखराची रचना केली जाते. या मजल्यांना भूमी असे म्हणतात. उदा. महाबलीपुरमच्या धर्मराज रथाला तीन भूमी आहेत तर तंजावरच्या बृह्दिश्वर मंदिराला तेरा भूमी आहेत.
- भूमीवर चारही बाजूंना नक्षीदार लहान-लहान मंदिराकृतींच्या रांगा निर्मिलेल्या असतात. त्यांना हार असे म्हणतात.
- भूमीच्या प्रत्येक कोपऱ्यावर असलेल्या लहान मंदिराकृतीला कूट म्हणतात.
- प्रत्येक भूमीवरील इतर लहान मंदिराकृतीना शाला असे म्हटले जाते.
- नागर मंदिरातील आमलक व कळस या ऐवजी द्राविड मंदिरात स्तुपिका असते.
- भारताच्या विविध प्रांतात विकसित झालेल्या पल्लव शैली, चोल शैली, राष्ट्रकुट शैली, चालुक्य शैली ह्या



31, Jawaharlal Nehru Road, Kolkata - 700 016,

In case of customer complaint please cont

द्राविड शैलीच्या उपशैली आहेत.

- गोपूर हे द्राविड मंदिरांचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. या शैलीतील मंदिरांभोवती सर्व बाजूंना मोकळे अंगण असते, त्याला प्राकार म्हणतात. नंतरच्या काळात परकियांच्या विध्वंसक आक्रमणांपासून मंदिरांचे संरक्षण करण्यासाठी प्राकाराभोवती एक उंच तट बांधण्यात येऊ लागला. या तटामधून मंदिरात जाण्यासाठी चारी दिशांना चार प्रवेशद्वारे असतात. या प्रवेशद्वारांना व त्यावरील रचनेला गोपूर म्हणतात.

**निष्कर्ष –**

- आज भारत प्राचीन मंदिरांच्यासंदर्भात जगभरातील पर्यटकांचे आकर्षण बनला आहे.
- दरवर्षी असंख्य पर्यटक प्राचीन मंदिरे पाहण्यासाठी भारताला भेट देतात.

**तळटीपा –**

- अ. प्र. जामखेडकर, महाराष्ट्र : इतिहास –प्राचीन काळ-स्थापत्य व कला, खंड १, भाग २, मुंबई २००२, पृ. ११८.
- विनायक कुलकर्णी, भारतीय कला उद्गम आणि विकास, पुणे, १९९६, पृ. ११.
- प्र. रा. अहिरराव, भारतीय मूर्तीपूजेचा इतिहास, पुणे, १९९६, पृ. ३.

**संदर्भ –**


- ग. ह. खरे, मूर्तीविज्ञान, पुणे, १९३९.
- महादेवशास्त्री जोशी (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड ४, पुणे, २००३.
- म. श्री. मते, प्राचीन कलाभारती, पुणे, १९९८..


◆◆◆◆

